# मुद्रांक शुल्क भरणा

मुद्रांक शुल्क हा दस्तावर (Document) / संलेखावर (Instrument) दयावयाचा एक कर आहे. मुद्रांक शुल्क न भरलेला अथवा कमी भरलेला दस्तऐवज हा त्यामध्ये नमूद व्यवहाराचा कायदेशीर पुरावा म्हणून ग्राहय धरला जात नाही. संबंधीत पक्षकाराने पहिली स्वाक्षरी करण्यापूर्वी, स्वाक्षरी करताना किंवा स्वाक्षरी नंतर लगेच पुढील कामकाजाच्या दिवशी मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. मुद्रांक शुल्काचा भरणा मुद्रांक कागद, चिकट मुद्रांक, फँकिंग, ई-एसबीटीआर अथवा ई-पेमेंन्ट व्दारे करता येते. संबंधीत पक्षकारांना जर उक्त संलेखावर किती मुद्रांक शुल्क भरावा याचे ज्ञान नसल्यास संबंधीत मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे कडे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम 31 अन्वये विहीत नमुन्यातील अर्ज व रू. 100 फी भरून ज्ञात करता येते.